Department of Agriculture
Government of Maharashtra

The World bank assisted

## Hon. Balasaheb Thackeray Agribusiness & Rural Transformation (SMART) Project

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# शेतमालाच्या संभाव्य किमतींचा अहवाल

# (२०२३-२४)


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे

## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष –कृषी


**सप्टेंबर -२०२३**

**बाजार माहिती आणि जोखीम निवारण कक्ष** **सप्टेंबर -२०२३**


**मका** हे आंतराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे अन्नधान्य पीक आहे. अमेरिका, चीन, ब्राझील, अर्जेंटिना आणि भारत या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. भारतात मका खरीप, रब्बी आणि उन्हाळी अश्या तिन्ही हंगामात घेतली जाते. प्रमुख मका उत्पादक राज्यांमध्ये मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांचा समावेश होतो.भारतात मक्याचा वापर हा मुख्यतः पोल्ट्री खाद्य, पशुखाद्य यासाठी केला जातो. या भारतात मक्याची मागणी, पुरवठा व उपभोग या घटकांमध्ये होणाऱ्या बदलाचा मक्याच्या किंमतीवर परिणाम होत असतो.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार सन २०२२-२३ मध्ये, जगात मागील वर्षांच्या तुलनेत ६ टक्के मक्याचे उत्पादन कमी होण्याच्या अंदाज आहे.





अमेरिकेच्या कृषी विभागाच्या अहवालानुसार मका निर्यात २०२१-२२ मध्ये ३४ लाख टन झाली होती त्यामध्ये चालू वर्षी २०२२-२३ मध्ये ६ लाख टनांची वाढ होऊन ती ४० लाख टन होईल असा अंदाज आहे.





केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या ३ अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याच्या उत्पादनात ६.५ टक्के वाढ होईल असा अंदाज आहे.




१ एप्रिल ते ३१ ऑगस्ट२०२३ या कालावधीत भारतात मक्याची आवक मागील वर्षीच्या तुलनेत ४३टक्के जास्त झाली.




महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या दुसऱ्या अग्रीम अन्नधान्य उत्पादन अंदाजानुसार देशात सन २०२२-२३ या वर्षी मक्याच्या उत्पादनात २४ टक्के वाढ होईल असा अंदाज आहे त्यामध्ये मुख्यतः खरिपात मका उत्पादन सुमारे १४ टक्क्यांनी जास्त असेल, मात्र प्रतिकूल हवामानामुळे भारतातील गेल्या वर्षीच्या तुलनेत रब्बीमध्ये उतपादन २.४ टक्के कमी




मागील तीन वर्षातील नांदगाव बाजारातील मक्याच्या ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती पुढील प्रमाणे.

२०२०- रुपये १२५३ प्रति क्विंटल

२०२१- रुपये १५२७ प्रति क्विंटल

२०२२-रुपये १८७७ प्रति क्विंटल


खरीप हंगाम २०२३-२४ साठी मका पिकाची आधारभूत किंमत (MSP) रु. २०९० प्रति क्विं. इतकी आहे.

**नांदगांव बाजारातील मक्याचे किंमत अंदाज पुढील प्रमाणे**


**ऑक्टो ते डिसें २०२३ : रुपये १७०० ते २२०० क्विंटल**

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष** **सप्टेंबर २०२३**


**तूर:** भारत हा जगातील सर्वात मोठा तूर उत्पादक तसेच उपभोक्ता देश आहे. भारतातील तूर उत्पादनात महाराष्ट्र, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश राज्यांचा वाटा ६० टक्के पेक्षा जास्त आहे. तूरीच्या बाजारपेठेवर मागील वर्षातील तूर साठा, आयात तसेच चालू वर्षातील उत्पादन यांचा परिणाम होताना दिसतो. केंद्र शासनाने तूर निर्यातीसाठी खुली केली असून तूरीचा आयात कोटा मर्यादित ठेवलेला आहे. विदेशी व्यापार महासंचालनालय (DGFT) ने प्रकाशीत केलेल्या अहवालानुसार तूरीसाठीचे –मुक्त आयात धोरण मार्च २०२४ पर्यंत वाढवण्यात आले आहे.





तूर हे खरीप पिक असून त्याची पेरणी जून ते जुलै व काढणी डिसेंबर ते फेब्रुवारी या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२२-२३ मध्ये तुरीचे उत्पादन सुमारे ३६.६६ लाख टन होण्याची शक्यता आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत १३ टक्क्यांनी कमी आहे. तसेच महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन १६.५ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ८.५ लाख टनांपर्यंत कमी होण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये आयात आणि निर्यात दोन्ही वाढले आहेत.




माहे डिसेंबर ते एप्रिल हा तुरीचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष ऑगस्ट २०२२-२३ मधील तुरीची आवक मागील वर्षाच्या तुलनेत कमी झालेली आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये ३.३ लाख टन होती, जी मागील वर्षी याच कालावधीत ३.९ लाख टन होती.




जून २०२२ पासून तुरीच्या किंमती वाढत आहेत. गतवर्षीच्या दरापेक्षा चालू वर्षी तुरीचे भाव जास्त आहेत.मागील तीन वर्षातील लातूर बाजारपेठेतील तुरीच्या जानेवारी ते मार्च मधील सरासरी किंमत खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| जाने ते मार्च २०२०: | रु. ६,४९८/क्विंटल |
| जाने ते मार्च २०२१: | रु. ६,३१०/क्विंटल |
| जाने ते मार्च २०२२: | रु. ७,७३५/क्विंटल |


सध्याच्या हंगामासाठी सरकारने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा (रु. ६६००/क्विंटल) सध्याच्या तुरीच्या किंमती जास्त आहेत.

## लातूर बाजारातील संभाव्य किंमती

**जानेवारी - मार्च २०२४:६८०० ते ७५०० /क्विं**


## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष सप्टेंबर २०२३

**हरभरा:** हरभरा हे भारतातील मोठ्या प्रमाणावर उत्पादन आणि उपभोग असणारे डाळवर्गीय पिक आहे. जागतिक पातळीवर एकूण डाळ उत्पादनापैकी २० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. भारत, ऑस्ट्रेलिया, तुर्की, म्यानमार, पाकिस्तान आणि इथिओपियासह सहा देश जागतिक हरभरा उत्पादनात सुमारे ९० टक्के योगदान देतात. भारत हा हरभऱ्याचा प्रमुख उत्पादक देश असून जगातील एकूण उत्पादनात भारताचा वाटा सुमारे ७०-७५ टक्के आहे. भारतातील एकूण डाळ उत्पादनापैकी ४०-५० टक्के हिस्सा हरभऱ्याचा आहे. देशभरात हरभऱ्याचा वापर डाळ व बेसन या दोन्ही स्वरूपात केला जातो.





हरभरा हे रब्बी पिक असून त्याची पेरणी ऑक्टोबर ते नोव्हेंबर व काढणी मार्च ते एप्रिल या दरम्यान केली जाते. भारत सरकारने जाहीर केलेल्या नवीन उत्पादन अंदाजानुसार सन २०२२-२३ मध्ये हरभऱ्याचे उत्पादन सुमारे १३६ लाख टन होण्याची शक्यता आहे जे मागील वर्षीच्या तुलनेत जवळपास सारखेच असल्याचे दिसून येते.


महाराष्ट्रातील २०२१-२२ मधील उत्पादन २७.२ लाख टनांवरून सन २०२२-२३ मध्ये ३६.३९ लाख टनांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे.




मागील वर्ष २०२०-२१ च्या तुलनेत २०२१-२२ मध्ये आयात आणि निर्यात दोन्ही घटले आहेत.




मार्च ते मे हा हरभऱ्याचा प्रमुख विक्री हंगाम असतो. चालू वर्ष ऑगस्ट २०२२-२३ मधील हरभऱ्याची आवक मागील वर्षाच्या तुलनेत थोडी कमी झालेली दिसून येत आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये ती ०.९ लाख टन इतकि आहे, जी मागील वर्षी याच कालावधीत १.१ लाख टन इतकी होती.




ऑक्टोबर २०२२ पासून हरभऱ्याच्या किंमती वाढत आहेत. डिसेंबर २०२२ नंतर, त्या मागील वर्षातील किमतींपेक्षा जास्त आहेत.
मागील तीन महिन्यातील लातूर बाजारपेठेतील हरभऱ्याच्या सरासरी किंमती खालीलप्रमाणे:

| | |
|---|---|
| ऑक्टो-डिसें २०२०: | रु. ४,७११/क्विंटल |
| ऑक्टो-डिसें २०२१: | रु. ४,६९९/क्विंटल |
| ऑक्टो-डिसें २०२२: | रु. ४,४५०/क्विंटल |


सध्याच्या रब्बी हंगामासाठी हरभऱ्याची सरकारने जाहीर केलेली किमान आधारभूत किंमत रु. ५३३५/क्विंटल आहे.

### लातूर बाजारातील संभाव्य किंमती


**ऑक्टोबर-डिसेंबर २०२३: रु. ५,२०० ते ५,८००/क्विं**

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष सप्टेंबर २०२३


**सोयाबीन:** सोयाबीन हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील महत्वाचे तेलबिया पिक आहे. अमेरिका, ब्राझील, आर्जेन्टिना, चीन व भारत या देशात सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. या प्रमुख देशातून जागतिक उत्पादनाच्या सुमारे ९० टक्के सोयाबीनचे उत्पादन होते. त्यामुळे या देशातील सोयाबीनची मागणी,पुरवठा व उपभोग या घटकामध्ये होणाऱ्या बदलाचा सोयाबीनच्या किमतीवर परिणाम होत





भारतात सन २०२३-२४ मध्ये सोयाबीनचे उत्पादन १२० लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. जे मागील वर्षी इतकेच आहे. ( स्त्रोत: WASDE, USDA)





अमेरिकन कृषी विभागाच्या, (WASDE, जुलै- २०२३) अहवालानुसार सन २०२३-२४ मध्ये, जगात ४१०७ लाख टन सोयाबीनचे उत्पादन होण्याची शक्यता वर्तविली आहे. जे मागील वर्षीच्या तुलनेत ८ टक्केनी (३७०१ लाख टन, २०२२-२३) अधिक आहे.





सन २०२२-२३ मध्ये सोयामीलच्या निर्यातीत मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झाली आहे. एप्रिल ते जुलै २०२३ या कालावधीत ४.२ लाख टन सोयापेंड निर्यात झाली आहे.




चालू वर्षी नोव्हेंबर २०२२ ते ऑगस्ट २०२३ या कालावधीत ३१.८२ लाख टन सोयातेल आयात केले आहे, मागील वर्षीच्या तुलनेत याच कालावधीपेक्षा कमी आहे. (स्रोत: SEA अहवाल, ऑगस्ट २०२३).




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात सोयाबीनची मासिक बाजारात आवक जास्त आहे. ( स्त्रोत: Agmarknet)




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी सोयाबीनच्या किंमती कमी आहेत. ( स्त्रोत: Agmarknet). मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:
ऑक्टो ते डिसें. २०२०: रु. ३९६४ प्रती क्विंटल.
ऑक्टो ते डिसें. २०२१: रु. ५९८० प्रती क्विंटल.
ऑक्टो ते डिसें. २०२२ : रु. ५४२५ प्रती क्विंटल.

सध्याच्या किंमती या खरीप २०२२-२३ हंगामासाठी जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमती (रु.४३००) पेक्षा जास्त आहेत. सन २०२३-२४ हंगामासाठी किमान


**लातूर बाजारातील संभाव्य किमतीं –**

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ : रु. ४७०० ते ५२०० प्रती क्विंटल.


सदर संभाव्य किंमत अंदाज हा FAQ ग्रेडच्या सोयाबीनसाठी आहे.

# कापूस


कापूस हे भारतातील सर्वात महत्वाचे व्यावसायिक पीक आहे जे 'व्हाइट-गोल्ड' म्हणून ओळखले जाते. जागतिक स्तरावर चीन आणि यूएसए नंतर भारत हा कापूस उत्पादन करणारा प्रमुख देश असून एकूण जागतिक कापूस उत्पादनापैकी25% वाट भारताचा आहे आहे.





गेल्या वर्षी 14 वर्षांमधील नीचांकी उत्पादनावर गेल्यानंतर, भारतातील कापूस पीक 337 लाख गाठी म्हणजे गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या तुलनेत 26 लाख गाठींनी जास्त असल्याचा अंदाज आहे.





2023-24 मध्ये जागतिक कापूस उत्पादन मागील वर्षाच्या तुलनेत किरकोळ वाढण्याची अपेक्षा आहे (0.5 टक्के किंवा 600,000 गाठी) ते 115.0 दशलक्ष गाठी युनायटेड स्टेट्समध्ये जास्त उत्पादनाची अपेक्षा तसेच चीन, तुर्कस्तान आणि पाकिस्तान मध्ये कमी उत्पादनाचा अंदाज आहे. (स्रोत:USDA –Cotton Outlook)




राष्ट्रीय आयात आणि निर्यातीच्या बाबतीत, मागील वर्षाच्या तुलनेत 2022-23 मध्ये आयातीत 55% वाढ आणि निर्यातीत 23% घट होण्याचा अंदाज आहे. हाच कल जागतिक पातळीवर दिसला असून मागील वर्षीच्या तुलनेत आयातीत 3.84% वाढ आणि निर्यातीत 1.81% घट झाली आहे.




मार्च महिन्यात बाजारात कापसाची आवक गतवर्षीप्रमाणेच असल्याचे दिसून येत आहे.





गेल्या चार महिन्यांपासून अकोला बाजारपेठेत कापसाचे भाव थोडे कमी होत आहेत. मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर या कालावधीतील कापसाच्या किमती पुढील प्रमाणे

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० - रु ५२५७ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२१ – रु ७९३९ प्रति क्विंटल
ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ – रु ८७६२ प्रति क्विंटल


**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ या कालावधीसाठी कापसाच्या किमती अंदाजे रु. ७५०० ते ८५०० प्रति क्विंटल**

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष सप्टेंबर २०२३


कांदा: कांदा (ॲलियम सेपा एल.) हे भारतातील विविध भागांमध्ये घेतले जाणारे एक महत्त्वाचे व्यावसायिक भाजीपाला पिक आहे. कांदा भारतीय आहारातील सर्वात महत्त्वाच्या वस्तूंपैकी एक आहे. लोकसंख्या वाढीमुळे कांद्याचा वापर वाढत आहे. कांदा पिक नाशवंत असल्याने किमतीत मोठ्या प्रमाणात चढ-उतार होताना दिसून येतात. भारत हा जगातील दुसरा क्रमांकाचा कांदा उत्पादक देश असून एकूण जागतिक उत्पादनात २०% वाटा आहे (FAO, २०२०). भारतात खरीप व रब्बी हंगामात कांद्याचे उत्पादन घेतले जाते. खरीप आणि लेट खरीप हंगामातील मिळून उत्पादनाचा एकूण कांद्याच्या उत्पादनात सुमारे ६० टक्के वाटा आहे. खरीप हंगामातील उत्पादन ऑक्टोबर ते जानेवारी या महिन्यात बाजारात येते. रब्बी कांदा पिकाची विक्री एप्रिल ते जून दरम्यान केली जाते.





मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षी ( २०२२-२३) भारतात कांद्याच्या उत्पादनात वाढ झाली आहे. मागील वर्षी ३१६.८७ लाख टन उत्पादन झाले होते. सन २०२२-२३ मध्ये ३१०.०५ लाख टन उत्पादन होण्याची शक्यता वर्तीवली आहे.





सन २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात कांद्याचे १२०.३२ लाख टन होण्याची शक्यता वर्तीवली आहे. मागील वर्षी सन २०२१ -२२ मध्ये १३६.६८ लाख टन कांदा उत्पादन झाले होते. (स्रोत: फलोत्पादन संचालनालय, GoM).




सन २०२२-२३ मध्ये कांद्याची निर्यात मागील वर्षाच्या तुलनेत ६४ टक्केनी अधिक आहे. एप्रिल ते जून २०२३ या कालावधीत ६.३०




मागील वर्षीच्या तुलनेत चालू वर्षात कांद्याची मासिक आवक जास्त आहे. ( स्रोत: AGMARKNET)




चालू वर्षी कांद्याच्या किंमती या मागील वर्षीच्या तुलनेत कमी आहेत. मागील तीन वर्षातील ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यातील सरासरी किंमती खालील प्रमाणे होत्या:

ऑक्टो ते डिसें. २०२०: रु. ३१५३ प्रती क्विंटल.
ऑक्टो ते डिसें. २०२१: रु. २३२१ प्रती क्विंटल.
ऑक्टो ते डिसें. २०२२ : रु. १८५४ प्रती क्विंटल.
(स्रोत: AGMARKNET)

## लासलगाव बाजारासाठीच्या संभाव्य किमतींचा अंदाज-

**ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ : रु. २००० ते ३००० प्रती क्विं.**

टीप: *सदर अहवाल हा बाजाराची सद्यस्थिती व भविष्यकालीन किंमतीविषयक अनुमान दर्शिवितो. आंतरराष्ट्रीय किंमती, हवामान, आर्थिक घटक, आणि सरकारी धोरण यामध्ये होणाऱ्या बदलामुळे संभाव्य किंमतीमध्ये बदल होऊ शकतो. परिणामी वास्तविक किंमती या संभाव्य किंमती पेक्षा वेगळ्या असू शकतात. त्यामुळे वाचकांनी या अहवालाचा काळजीपूर्वक वापर करावा*


अधिक माहितीसाठी

**बाजार माहिती विश्लेषण व जोखीम व्यवस्थापन कक्ष, पुणे**

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

एम.एस.एफ.सी बिल्डींग, २७० भाम्बुर्डा, नारायण एस.बी.मार्ग,

सिंबायोसिस कॉलेज, गोखले नगर, पुणे ४११०१६

फोन: ०२०-२५६५६५७७, टोल फ्री: १८०० २१० १७७०, ई-मेल: mirmc.smart@gmail.com

वेबसाईट: https://www.smart-mh.org